| MHKO050017322025 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०८०/२०२५.**<br>**(महाराष्ट्र शासन वि. गोविंद रामचंद्र पोवार)**<br>**न्या य नि र्ण य**<br>**(दि.१२ जून २०२६ रोजी अधिघोषित.)** |
|---|---|

सदरील खटला आरोपी विरुध्द मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा १८८७ चे कलम १२ 'अ' अन्वये चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे:-**

२. दि.२१/०३/२०२५ रोजी १३.१५ वाजता शहापूर गांवातील आंबेडकर चौक जवळील सहारा पॉन शॉप येथे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपी हे स्वतःच्या फायद्यासाठी आकड्यावर पैसे लावून कल्याण मटका जुगार खेळत व खेळविताना मिळून आला. आरोपी हे जुगाराची साधने व रोख पैशांसह मिळून आले. त्यामुळे आरोपी विरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ 'अ' प्रमाणे फिर्याद दाखल करण्यात आली.

३. सदर खटल्यात आरोपपत्राचे अवलोकन केल्यानंतर आरोपी विरुध्द दोषात्मक बाबी आढळून आल्यामुळे मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा, कलम १२'अ' अन्वये **नि.क्र.७** अन्वये वरील गुन्ह्याचे विवरण आरोपीला त्याच्या मातृभाषेत समजावून सांगितले असता आरोपीने वरील गुन्हा नाकारला व खटला चालविण्यात यावा अशी विनंती केली.

४. सदर खटल्यातील इतर साक्षिदारांना वारंवार साक्षी समन्स काढून देखील ते साक्ष देण्यास आले नाहीत. त्यामुळे उपलब्ध पुराव्याच्या गुणवत्तेवरुन अभियोगपक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश पारीत करून बंद करण्यात आला.

५. आरोपी विरुध्द दोषात्मक पुरावा मिळून न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोगपक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे व आरोपींचे विधिज्ञ श्रीमती जे. जी. शेख यांचा युक्तिवाद ऐकला. सदर खटल्यात नमूद असलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| **१.** अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि.२१/०३/२०२५ रोजी १३.१५ वाजता शहापूर गांवातील आंबेडकर चौक जवळील सहारा पॉन शॉप येथे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपी हे स्वतःच्या फायद्यासाठी आकड्यावर पैसे लावून कल्याण मटका जुगार पैसे लावून खेळत व खेळवित असताना रोख रक्कम रुपये २३५०/- व जुगाराच्या साधनांसह मिळून आले ? | **नकारार्थी.** |
| **२.** काय आदेश | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता:-**

**७.** अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.१ पंच श्री.योगेश बाळू माने यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी सरतपासात कथन केले की, दि.२१/०३/२०२५ रोजी शहापूर पोलिसांनी त्यांना पोलिस स्टेशनमध्ये बोलविल्याचे आठवत नाही. त्यांची सही घेतली होती. कशाचा पंचनामा झाला याची त्यांना माहिती नाही. ते आरोपीला ओळखत नाहीत. सदर साक्षिदाराने अभियोगपक्षास मदत होईल अशी साक्ष न दिल्याने त्यांनी साक्षिदाराचा उलटतपास घेतला परंतु, सदर साक्षिदाराने उलटतपासात देखील अभियोगपक्षास मदत होईल असे कोणतेही कथन केले नाही.

**८.** सदर साक्षिदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता, घटनास्थळ पंच फितूर झाला असल्याने ते सिध्द करण्यास अभियोगपक्षास यश आले नाही. तसेच अभियोगपक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील दुसरा साक्षिदार तपासलेला नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही.

**९.** फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षिदारांची साक्ष नोंदविण्यात अभियोगपक्षास यश मिळून आलेले नाही. तसेच आरोपी हा कल्याण मटका जुगाराचा खेळ खेळत होते हे देखील सिध्द झालेले नाही. तसेच आरोपीच्या ताब्यात दि.२१/०३/२०२५ रोजी जुगाराचे साहित्य व रोख रक्कम रुपये २३५०/- मिळून आले हे देखील सिद्ध झालेले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपींविरुध्द मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२'अ' अन्वये गुन्हा सिध्द करु शकलेला नाही. म्हणून मी **मुद्दा क्र.१** चा निष्कर्ष **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र.२ करिता:-**

**१०.** अभियोगपक्ष आरोपींविरुध्द मुंबई जुगार प्रबिबंधक कायदा कलम १२'अ' अन्वये गुन्हा सिध्द करु शकलेला नाही. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

**आ दे श**

१. **आरोपी गोविंद रामचंद्र पोवार** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २५५(१) अन्वये मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा, कलम १२-अ या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी यांचे पुर्वी दाखल केलेले जातमुचलके व जामिनकदबा रद्द करण्यात येतात व त्यांच्या जामिनदारास जामिनबंधपत्रातून मुक्त करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल आकडे लिहीलेली चिठ्ठी व बॉलपेन हे मुल्यहीन असलेने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावेत.

४. सदर खटल्यातील जप्त रोख रुपये २३५०/- ही अपिलाचा कालावधी संपल्यानंतर सरकार जमा करण्यात यावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.09 17:26:31 +0530

(आर. डी. खराटे )
दि.०९/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी.